# ॥ शिवसृष्टी ॥

**‘श्रीशिव-समर्थ गड’** हा श्रीमहाराजांचा अतिशय भव्य-दिव्य असा प्रकल्प. गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपती श्री शिवाजी महाराज हे श्रीमहाराजांचे आराध्य दैवत. श्री शिवरायांच्या ओजस्वी चरित्राने श्रीमहाराजांच्या मनात अगदी बालपणीच देशभक्तीचे बीज टाकलेले. त्या ऊर्मीतून श्रीमहाराज स्वातंत्र्य चळवळीत लढले. मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाज सुसंघटितपणे राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला वाहून घेईल आणि राष्ट्र बलशाली होईल ही अपेक्षा फोल ठरू लागली. मरगळलेल्या समाजमनाला जागे करण्यासाठी, त्याच्या पौरुषाला आवाहन करून राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी उद्युक्त करण्यासाठी छत्रपतींचे स्फूर्तिदायक चरित्र त्याच्यासमोर उभे करण्यासाठी श्रीमहाराजांनी शिवसृष्टीच्या निर्मितीचा संकल्प सोडला.

गोव्यातील प्रख्यात मूर्तिकार श्री. दादा पाटकर आणि त्यांचा मुलगा प्रकाश तसेच पुतण्या आत्माराम यांनी शिवसृष्टी साकार करण्याची जबाबदारी उचलली. त्याच वेळी डेरवण आणि सावर्डे येथील काही हितशत्रूंनी श्रीमहाराज आणि त्यांचे ट्रस्ट यांच्या विरोधात एक मोठी मोहीम काढून कडवा संघर्ष सुरू केला. ट्रस्टच्या समाजोपयोगी कामामुळे ज्यांचे हितसंबंध धोक्यात आले, स्थानांना धोका निर्माण झाला आणि ट्रस्टच्या लोकप्रियतेमुळे ज्यांच्या पोटात असुयेचा शूळ उठला असे गावपुढारी, जनतेच्या आर्थिक दौर्बल्यावर ज्यांचे धंदे अवलंबून आहेत असे शेट-सावकार आणि ट्रस्टच्या निशाणाखाली होणारी हिंदूंची संघटना पाहून हादरलेले मुस्लीम पुढारी यांची अनिष्ट युती झाली आणि ट्रस्टवर खोटेनाटे आरोप, कोर्ट खटले, मोर्चे आणि हिंसक हल्ले यांचे सत्र सुरू झाले. स्थानिक मजूरसुद्धा कामाला मिळू नयेत म्हणून बहिष्काराचे सत्र सुरू झाले.

मात्र श्रीमहाराज अविचल होते. निर्भयपणे आपले कार्य ते करीत राहिले.

दि. ०५/०५/१९८१ रोजी खासदार श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्या शुभहस्ते श्रीशिव-समर्थ मंदिराचे उद्घाटन झाले. समारंभात येणाऱ्या लोकांना वाटेत अडवून विरोधकांनी मारहाण केली. रस्ते अडवून धरले त्यामुळे अनेक लोक, पत्रकार तसेच प्रमुख पाहुणे समारंभस्थळी पोहोचू शकले नाहीत. मात्र तरीही समारंभ थाटात पार पडला. आज शिव-समर्थ गडाची ख्याती उभ्या देशभर पसरली आहे. प्रतिदिनी तो पाहण्यासाठी पर्यटकांची रीघ लागलेली असते. श्रीशिव-समर्थ गड हे शिवरायांचे स्फूर्तिप्रद स्मारक आहे. त्याचप्रमाणे ते श्रीमहाराजांच्या दूरदृष्टीचे, दीर्घोद्योगाचे, निर्भयपणाचे आणि शिवभक्तीचे स्मारक आहे !

**शिवसृष्टी साकार होताना...**
















श्रीशिव-समर्थ गडाचे भव्य प्रवेशद्वार (१९८१)




गोमाता

जगद्गुरू श्री तुकाराम महाराज

श्रीसमर्थ रामदास स्वामी



श्रीसंत नामदेव महाराज



श्रीभवानी माता
(श्रीशिव-समर्थ मंदिरातील मूर्ती)

श्रीशिव-समर्थ मंदिर, श्रीक्षेत्र डेरवण





किल्ले शिवनेरीवर शिवबांचा जन्म
तीनशे वर्षांच्या भीषण काळरात्रीनंतर स्वातंत्र्याचा उषःकाल झाला!



बाल शिवाजी आणि दादोजी कोंडदेव



रोहिडेश्वरासमोर स्वराज्याची शपथ



शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। शिवरायाचा आठवावा प्रताप। भूमंडळी॥



राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे।।



निघाला काळ अफझलखां। धरूनी पोर आणाया। पहाता तेज ते दैवी। निमाली राक्षसी माया।।



छातीचा कोट करून बाजीप्रभूने पावन खिंड लढविली



पुण्यातील लाल महालात शिवबांनी खानाची बोटेच तोडली



द्रष्ट्या राजाने कोकण किनाऱ्यावर आरमार उभारले



नेताजी पालकर यांचे शुद्धीकरण



कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची सन्मानपूर्वक परत पाठवणी



शिवबांच्या कपाळी कुंकुमतिलक लावून औक्षण करणाऱ्या माता-भगिनी



खडक फोडिता सजीव रोडकी। पाहिली सर्वांनी बेडकी।।



## ।। श्रीशिवराज्याभिषेक सोहळा ।।



राज्याभिषेक प्रसंगी मातोश्री जिजाऊंचा आशीर्वाद घेताना श्रीशिवाजी राजे



कृतार्थतेचा क्षण!

शिवसृष्टीला मूर्तरूप देणारे शिल्पकार
श्री. दादा पाटकर यांचा सत्कार करताना श्रीमहाराज.








## शिव छत्रपती राजा महाराष्ट्राचा। अवतार महादेवाचा।।



श्रीशिव-समर्थ मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी
मा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्यासमवेत श्रीमहाराज



श्रीशिव-समर्थ मंदिरात श्रीमहाराज



श्रीशिव-समर्थ मंदिरात श्री. वालावलकरसाहेब



# ॥श्रीशिवजयंती उत्सव॥

श्रीशिव-समर्थ गड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षी फाल्गुन वद्य तृतीयेला तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी करण्यात येते. सकाळी ठीक नऊ वाजता श्रीशिव-समर्थ गडात एका भव्य सभेचे आयोजन केलेले असते. समारंभस्थानी पाहुण्यांचे ढोल, ताशे, तुताऱ्यांच्या गजरात आगमन होते. श्रीशिव-समर्थ मंदिरात दर्शन घेऊन आल्यावर ध्वजपूजन, ध्वजारोहण, श्रीमहाराज विरचित 'ध्वज-वन्दनम्' स्तोत्राचे गायन, ब्रह्मवृंदाकडून शांतीसूक्त पठण होऊन मग सभेला सुरुवात होते. अनेक अभ्यासू आणि नामवंत वक्ते शिवचरित्रावर आपले विचार व्यक्त करतात. श्रीमहाराज देहधारी असताना सभेच्या शेवटी ते आपले मार्गदर्शक मौलिक विचार व्यक्त करीत असत. श्रीमहाराज विरचित 'वरयाचना' या प्रार्थनेने सभेची सांगता होते.

सायंकाळी चार वाजता श्रीशिव-छत्रपतींच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात येते. श्रीमहाराज देहधारी असताना श्रीशिवछत्रपतींची प्रतिमा शृंगारलेल्या पालखीत ठेवून छत्र-चामरे, चवऱ्या, पंखे, अबदागीर, गरुड, हनुमंत आदींसह भगवी निशाणे फडकावीत, टाळ-मृदुंग, ढोल ताशे यांच्या गजरात सीतारामबुवांच्या समाधिमंदिरापासून डेरवण-सावर्डेसीमेवरील श्री ज्ञाननाथ महाराज मंदिरापर्यंत जाऊन मिरवणूक पुन्हा शिव-समर्थ गडात येत असे.

भजनी दिंड्या, लेझीम पथके, झांज पथके, लाठी-काठी, दांडपट्टा यांची प्रात्यक्षिके करणारी तालीमबाज मंडळी मिरवणुकीत सामील झालेली असत. ढोलांच्या तालावर भगवे फेटे बांधून तरुण भगवे झेंडे घेऊन देहभान विसरून नाचत असत. श्रीमहाराज मिरवणुकीत सर्वत्र फिरून सर्वांना प्रोत्साहन द्यायचे. ''शिव छत्रपती राजा महाराष्ट्राचा। अवतार महादेवाचा॥'' हा त्यांचा आवडता गजर सांगून देहभान विसरून नाचायचे.



ध्वजपूजन



श्रीमहाराज, ब्रह्मचारी विश्वनाथजी, शेलारमामा आणि अन्य 'ध्वज-वन्दनम्' प्रार्थना गाताना



मा. शिवसेनाप्रमुख सपत्नीक ध्वजपूजन करताना



श्रीमहाराज आणि शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे ध्वजारोहण प्रसंगी



श्रीमहाराज आणि ब्रह्मचारी विश्वनाथजी ध्वजारोहणासाठी येताना

स्वराष्ट्र-धर्म-रक्षणाय देहि शौर्यमुत्तमम्।
बलं यशः सुखप्रदं स्वदेश-भक्ति-संयुतम्।
त्वदीयमान-रक्षणार्थमर्पितामिमां तनुम्।
सदैव वन्दनं करोमि नित्यमिच्छितुं जयम्॥



श्रीमहाराज ध्वजारोहण प्रसंगी जयघोष करताना



शिवजयंती सभेत विचार व्यक्त करताना श्रीमहाराज



शिवजयंत्युत्सव सभेत व्यासपीठावर (डावीकडून): सर्वश्री बद्रीशेठ भंडारी, निवृत्तीमहाराज देशमुख, शंकर महाराज, शेलारमामा, श्रीमहाराज, केशवराव कबीर



श्रीशिव-समर्थ मंदिराच्या उद्‌घाटन सोहळ्यात उपस्थितांचे स्वागत करताना श्रीमहाराज (दि. ५ मे १९८१)
व्यासपीठावर (डावीकडून) :
मा. आ. राजाराम शिंदे, श्री. दी. ना. बाणावली,
मा. खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण,
श्री. कमलाकरपंत वालावलकर, श्री.मन्यासाहेब राजेशिर्के इ.



मा. खा. प्रेमलाताई चव्हाण, वे.मू. ल. वि. सप्रेगुरुजी (खाली बसलेले), श्रीमहाराज, सर्वश्री प्रभाकर कुंटे, दी. ना. बाणावली इ.



श्री. शेलारमामा आणि श्रीमहाराज



मा. शिवाजीराव भोसले, शेलारमामा आणि श्रीमहाराज



श्रीमहाराजांचे स्फूर्तिदायी वक्तृत्व लक्षपूर्वक ऐकताना
प्रा. शिवाजीराव भोसले आणि शेलारमामा



शिवजयंती सभेत व्यासपीठावर : श्री शंकर महाराज, अमृतराव भोसले,
ब्रह्मचारी विश्वनाथजी आणि श्रीमहाराज



शिवजयंती सभेत व्यासपीठावर डावीकडून : मा. बाळासाहेब ठाकरे,
शंकर महाराज, साताऱ्याच्या राजमाता श्रीमंत कल्पनाराजे भोसले,
सौ. मीनाताई ठाकरे, शिवाजीराव भोसले, दादा पाटकर, शेलारमामा
आणि श्रीमहाराज; पाठीमागे उभे श्री. वालावलकरसाहेब,
संभाजीराव जाधव व इतर (दि. २०-३-१९८४)



शिवजयंतीसाठी उपस्थित श्रोतृवर्ग



शिवजयंतीसाठी आलेल्या माता-भगिनी





श्रीशिव-समर्थ मंदिरात जगद्गुरू श्री तुकाराम महाराज
यांची पूजा करताना श्रीमहाराज



श्रीक्षेत्र डेरवण येथील पालखी
सोहळ्यात श्रीमहाराज;
त्यांच्या डावीकडे सर्वश्री शेलारमामा,
काशीनाथबुवा भोसले व इतर



शिवजयंतीनिमित्त आयोजित
कार्यक्रमात भक्तिसंगीत
सादर करताना श्री. स्नेहल भाटकर;
डावीकडून सर्वश्री दादा पाटकर,
निवृत्तीमहाराज देशमुख,
श्रीमहाराज,
दामूअण्णा माळी आणि
ब्रह्मचारी विश्वनाथजी